महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र राज्य, हिंदी, सिंधी, गुजराती, संस्कृत, तेलुगु,
बंगाली, गोरबंजारा साहित्य अकादमी

दूरध्वनी : ०२२ - २२६७२५३९
ई - मेल : mhsahityaacademy@gmail.com

ओल्ड कस्टम हाऊस, विकास विभाग इमारत, दुसरा मजला,
शहिद भगतसिंह मार्ग, मुंबई - ४०० ००१.

मराठी मधून इतर भारतीय भाषांमध्ये आणि इतर भारतीय भाषांमधून मराठीमध्ये अनुवादासाठी अनुदान योजना प्रवेशिका / अर्ज मागविणेबाबत.

महाराष्ट्र राज्य, हिंदी, सिंधी, गुजराती, संस्कृत, तेलुगु, बंगाली, गोरबंजारा साहित्य अकादमीद्वारे "मराठी मधून इतर भारतीय भाषांमध्ये आणि इतर भारतीय भाषांमधून मराठीमध्ये अनुवादासाठी अनुदान योजना" यासाठी प्रवेशिका / अर्ज मागविण्यात येत आहेत.

सर्व भारतीय नागरिक / साहित्यकार या योजनेअंतर्गत अनुदानासाठी प्रवेशिका पाठवू शकतात. या योजनेअंतर्गत मूळ मराठी पुस्तकाचा इतर भारतीय भाषांमध्ये (हिंदी, सिंधी, गुजराती, संस्कृत, तेलुगु, बंगाली, गोरबंजारा) आणि इतर भारतीय भाषांतील (हिंदी, सिंधी, गुजराती, संस्कृत, तेलुगु, बंगाली, गोरबंजारा) पुस्तकांचा मराठीमध्ये केलेला अनुवाद पात्र राहील. साहित्य क्षेत्रातील पुढील वाङ्मय प्रकार या योजनेअंतर्गत पात्र राहतील. (कविता, नवलकथा, लघुकथा, नाटय / एकांकिका, कादंबरी, आत्मचरित्र, चरित्र, ललित, बालसाहित्य, लोकसाहित्य, प्रवासवर्णन, वैज्ञानिक साहित्य इत्यादी.)

अर्ज / प्रवेशिका महाराष्ट्र राज्य, हिंदी, सिंधी, गुजराती, संस्कृत, तेलुगु, बंगाली, गोरबंजारा साहित्य अकादमी, जुने जकात घर, विकास विभाग इमारत, दुसरा मजला, शहिद भगतसिंग मार्ग, मुंबई - ४००००१ या पत्त्यावर दिनांक १६ नोव्हेंबर २०२६, सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. उपरोक्त योजने संबंधित अधिक माहिती, नियम, अटी-शर्ती व अर्ज www.maharashtra.gov.in आणि www.mahasahitya.org या संकेतस्थळावर नवीनतम संदेश या मथळयाखाली उपलब्ध आहे.

दि. ०१/११/२०२६

Sd/-
सहसंचालक तथा सदस्य सचिव
महाराष्ट्र राज्य, हिंदी, सिंधी, गुजराती, संस्कृत,
तेलुगु, बंगाली, गोरबंजारा साहित्य अकादमी

मराठी मधून इतर भारतीय भाषांमध्ये आणि इतर भारतीय भाषांमधून मराठीमध्ये अनुवादासाठी अनुदान योजना

१. **उदिद्ष्ट** : - मराठी व इतर भारतीय भाषांमध्ये साहित्यिक आदान-प्रदान होण्याच्या दृष्टीने मराठी भाषेतील उत्कृष्ट साहित्यकृतींचा इतर भारतीय भाषांमध्ये आणि इतर भारतीय भाषांमधून मराठीमध्ये अनुवाद करण्यासाठी प्रोत्साहनात्मक अनुदान देणे. (इतर भारतीय भाषा - सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत कार्यरत त्या-त्या साहित्य अकादमींशी संबंधीत भाषा)

२. **योजनेचे स्वरुप** : - ज्या साहित्यकृती अनुवादित करून प्रकाशित करण्यासाठी परीक्षण समितीमार्फत पात्र ठरविण्यात येतील किंवा साहित्यिक मूल्य लक्षात घेता शासनाद्वारे ज्या साहित्यकृती अनुवादासाठी निश्चित करण्यात येतील अशा साहित्यकृतींच्या प्रकाशनासाठी प्रती शब्द २.०० रु प्रमाणे अनुदान देण्यात येईल.

३. योजनेसाठीची पात्रता:-

३.१ सर्व भारतीय नागरिक या योजनेअंतर्गत अर्ज करण्यास पात्र असतील.

३.२ या योजनेअंतर्गत मूळ मराठी पुस्तकाचा इतर भारतीय भाषांमध्ये आणि इतर भारतीय भाषांतील पुस्तकाचा मराठी मध्ये केलेला अनुवाद पात्र राहील.

३.३ साहित्य क्षेत्रातील पुढील वाङ्मय प्रकार या योजनेअंतर्गत पात्र राहतील. कविता, नवलकथा, लघुकथा, नाट्य/एकांकिका, कादंबरी, आत्मचरित्र,चरित्र, ललित, बालसाहित्य, लोकसाहित्य, प्रवास वर्णन, वैज्ञानिक साहित्य इ. साहित्यिक प्रकार.

३.४ मूळ मराठी भाषेतील व इतर भारतीय भाषांतील निवडक कथा, कविता, निबंध, लेख इ. साहित्य प्रकारांचे अनुवादीत संकलन सुध्दा या योजनेअंतर्गत पात्र राहील.

३.५ एका अनुवादकास एका आर्थिक वर्षात जास्तीत जास्त ५ पुस्तकांच्या अनुवादासाठी अनुदान देण्यात येईल.

३.६ साहित्यकृतीच्या प्रथम आवृत्तीच्या प्रकाशनासच हे अनुदान मिळेल. पुनर्मुद्रण अथवा त्या नंतरच्या आवृतीच्या प्रकाशनासाठी हे अनुदान देय असणार नाही.

४. योजनेसंबंधी सर्वसाधारण अटी व शर्ती :-

४.१ पुस्तकाच्या मुळ लेखकाची / हक्कधारकाची परवानगीची प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

४.२ साहित्यकृती अनुदानासाठी पात्र ठरल्यानंतर सदर साहित्यकृतीच्या प्रकाशनाची व्यवस्था लेखकास / अनुवादकास स्वतः करावी लागेल.

४.३ या योजनेंतर्गत प्रकाशित होणाऱ्या पुस्तकाला कोणत्याही खाजगी संस्था, राज्य शासन अथवा केंद्र शासनाचे कोणतेही अनुदान घेता येणार नाही.

४.४ साहित्यकृतीच्या प्रकाशनासाठी पात्र / अपात्रतेसंदर्भात समितीने घेतलेला निर्णय अंतिम राहील.

४.५ साहित्यकृतीच्या प्रकाशनाला अनुदान मंजूरीनंतर ३ महिन्याच्या कालमर्यादेत किंवा अनुदान मंजूरीच्या पत्रात प्रकाशनासाठी नमूद केलेल्या कालमर्यादेतच सदर पुस्तक प्रकाशित करणे आवश्यक असेल.

४.६ साहित्यकृती प्रकाशित झाल्यानंतर त्याच्या २५ प्रती अकादमीस विनामूल्य पाठविणे अनिवार्य आहे.

४.७ साहित्यकृतीचे प्रकाशन करताना त्याच्या पहिल्या पानावर खालील मजकूर ठळक स्वरुपात प्रकाशित करणे आवश्यक आहे.

हे पुस्तक महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत कार्यरत साहित्य अकादमीच्या मराठी मधून इतर भारतीय भाषांमध्ये आणि इतर भारतीय भाषांमधून मराठीमध्ये अनुवादासाठी अनुदान योजना अंतर्गत प्राप्त अनुदानाच्या सहयोगातून प्रकाशित करण्यात येत आहे.

४.८ अर्जातील माहिती खोटी असल्यास किंवा योजनेच्या अटी / शर्तींचे भंग झाल्याचे आढळल्यास मंजूर केलेले अनुदान रद्द करण्यात येईल आणि जर अनुदान दिले असेल तर ते व्याजासहीत परत घेतले जाईल. आवश्यकता भासल्यास कायदेशीर उपाय योजना केली जाईल.

४.९ या योजनेअंतर्गत अनुदानाची मागणी अमान्य करताना कोणतेही कारण दिले जाणार नाही.

४.१० मुळ पुस्तकाच्या लेखकाची/हक्क धारकाची परवानगी घेण्याची जबाबदारी संबंधित अनुवादकाची असेल.

४.११ मुळ पुस्तकाच्या लेखकाचे/हक्क धारकाचे मानधनाबाबतचा खर्च, पुस्तक छपाईचा खर्च इ. सर्व खर्च अनुवादकांना मिळणाऱ्या अनुदानातून भागविणे आवश्यक आहे. अनुदानव्यतिरिक्त अतिरिक्त निधी देय असणार नाही.

४.१२ या योजनेतून प्रकाशित पुस्तक या साहित्य अकादमीच्या पुरस्कार योजनेअंतर्गत पुरस्कारासाठी पात्र असणार नाही.

टिप :- एखाद्या लेखकाच्या साहित्यकृतीचे महत्व जाणून या योजनेच्या अटी / शर्तींमध्ये शिथीलता देऊन सदर साहित्यकृतीच्या प्रकाशनासाठी अनुदान देण्याचे अधिकार साहित्य अकादमीच्या कार्याध्यक्षांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारी समितीस राहील.

परिशिष्ट - अ

मराठी मधून इतर भारतीय भाषांमध्ये आणि इतर भारतीय भाषांमधून मराठीमध्ये अनुवादासाठी अनुदान योजनेसाठी प्रवेशिका / अर्ज

PHOTO

प्रति,
मा. अध्यक्ष / कार्याध्यक्ष,
साहित्य अकादमी, महाराष्ट्र राज्य.

१	अर्जदाराचे नाव	
२	पत्ता	
३	जन्म दिनांक	
४	मोबाईल नं. / ई-मेल आयडी	
५	व्यवसाय	
६	शैक्षणिक अर्हता	
७	अनुवादित पुस्तकाचे शीर्षक - मूळ लेखक -	
८	विधा / साहित्यिक प्रकार	
९	पृष्ठ संख्या - अंदाजित शब्द संख्या -	
१०	मूळ लेखक/हक्कधारकाचे सहमती पत्र सोबत जोडले आहे का?	

११	यापूर्वी प्रकाशित / अनुवादीत साहित्य (यादी स्वतंत्रपणे जोडू शकता)	

सोबत जोडलेल्या कागदपत्रांची यादी :-

१. आधार कार्ड
२. पॅनकार्ड
३. रद्द केलेला धनादेश / पासबुकच्या पहिल्या पानाची छायाप्रत.
४. मूळ लेखकाचे सहमती पत्र / ना हरकत पत्र.
५. विस्तृत परिचयपत्र (Detail Biodata)

दिनांक : स्वाक्षरी
ठिकाण : (नाव --)

परिशिष्ट – ब

“मराठी मधून इतर भारतीय भाषांमध्ये आणि इतर भारतीय भाषांमधून मराठीमध्ये अनुवादासाठी अनुदान योजना” या योजनेअंतर्गत अनुदान मंजूर झाल्यास खालील बाबींची पुर्तता करण्याची मी हमी देतो / देते.

१. या योजनेअंतर्गत प्राप्त निधीचा विनियोग योग्य त्या कामासाठी करण्यात येईल.

२. निश्चित करून दिलेल्या कालावधीत अनुवादित पुस्तक प्रकाशित करण्यात येऊन त्याच्या २५ प्रति अकादमी कार्यालयास पाठविण्यात येतील.

३. या योजनेअंतर्गत अर्ज करण्यापूर्वी मी मूळ लेखकाची अनुमती घेतली असून त्याबाबतची प्रत सोबत जोडली आहे.

४. मी हे देखील प्रमाणित करतो / करते की, या पुस्तकासाठी मला राज्य / केंद्र शासनाकडून किंवा इतर कोणत्याही अकादमीकडून अनुदान मिळालेले नाही.

५. या योजनेच्या शासन निर्णयात / जाहिरातीत नमूद सर्व अटी शर्ती मी वाचलेल्या आहेत. त्या मला मान्य आहेत.

दिनांक : स्वाक्षरी

ठिकाण : (नाव --------------------------------------)